MHYA-1000-2421-2022

दाखल तारीख-२७/१२/२०२२
नोंदणी तारीख-२७/१२/२०२२
निकाल तारीख- २१/०४/२०२६
कालावधी - **०३ वर्षे ०३ महीने २४दिवस**

**२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, केळापूर , यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी कु. सायमा निखत अब्दुल सत्तार शेख )**

**नियमित फौजदारी केस क्रं. २२४/२०२२** **निशाणी क्र. २१**
**(MHYA-1000-2421-2022)**

महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस स्टेशन, .....**अभियोग पक्ष**
पांढरकवडा जि. यवतमाळ

**विरुध्द**

प्रफुल देवानंद खंडारे .....**आरोपी**
वय- २० वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा. सायखेडा, ता. केळापूर जि. यवतमाळ

.................................................................................

**दोषारोप- भारतीय दंड विधानचे कलम ३६३ भा.द.वि. प्रमाणे**

.................................................................................

अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील - श्री. एस. बी. जगताप
आरोपी तर्फे विद्वान वकील - श्री. एम.एम.चौधरी

.................................................................................

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of Offence) | १५/०९/२०२२ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | १५/०९/२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of charge-sheet) | २७/१२/२०२२ |
| दोषारोप / प्रतीकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge) | १२/०६/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक (Date of Commencement of evidence) | १७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक (Date on which judgment is reserved) | १७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the judgment) | २१/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of the sentencing Order, if any.) | ........... |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नांव (Name of Accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of Arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of Release on Bail) | कलम (Offences charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असलयाची तारीख कलम ४२८ प्रमाणे (Period of Detention Undergone during Trial for purpos |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | e of Section 428 Cr.P.C.) |
| १. | **प्रफुल देवानंद खंडारे** | —— | १९/०९ /२०२२ | ३६३ भा.द.वी. | निर्दोष मुक्तता | —— | —— |

## न्या य नि र्ण य

## (घोषित दिनांक २१ एप्रिल २०२६)

आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३६३ अन्वये दंडनीय अपराधाचा आरोप ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन

**२.** फिर्यादीचे बहिणीची मुलगी सदरहु प्रकरणात हि पिडीत असल्याने तीची ओळख हि ***फौजदारी प्रकिया संहिता*** (यानंतर **'फौ.प्र.सं.'**) ***कलम २२८*** प्रमाणे गुप्त ठेवण्यात येत आहे. यापुढे तिला ***"पिडीत-स"*** या नावे संबोधण्यात येते. मौजा. सायखेडा, पांढरकवडा जि. यवतमाळ येथुन दिनांक १५.०९.२०२२ रोजी सकाळी ०६.३० वाजताच्या सुमारास कोणालाही काही न सांगता निघुन गेली तिचा शोध घेतला असता मिळाली नाही.सदर मुलीस नामे प्रफुल देवानंद खंडारे रा. सायखेडा याने फुस लावुन पळून नेल्याची फिर्याद पोलिस स्टेशन पांढरकवडा येथे दिली.

## अन्वेषन व दोषारोप

**३.** दिनांक १५.०९.२०२२ रोजी पोलिस ठाणे पांढरकवडा, ता. केळापुर जि. यवतमाळ येथील ठाणे अंमलदाराकडे फिर्यादीने तोंडी फिर्याद दिली, त्याने ती लेखनीविष्ट केली व त्यावरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निदर्षनास आल्यामुळे ***पहिली खबर क्रमांक १०७२/२०२२*** वरील

कलमाखाली नोंदविण्यात आली. पुढील अन्वेषण **पो.ना. दुर्गाप्रसाद शि. मिश्रा** यांच्याकडे सोपविण्यात आले. अन्वेषणादरम्यान घटनास्थळ तयार करण्यात आला, साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले व आरोपीला अटक करण्यात आली व कलम ४१ ब पोटकलम ३ अन्वये नोटीसवर सोडण्यात आले. आरोपीविरुध्द अन्वेषण पुर्ण केल्यानंतर ***कलम १७३ (२) फौजदारी प्रक्रिया संहिता*** (यानंतर 'फौ.प्र.सं.') अन्वये अंतिम अहवाल दाखल करण्यात आला.

## खटला सुरु

४. ***कलम १७३ (२) फौ.प्र.सं.*** खालील पोलिस अहवाल व त्याबरोबर पाठवलेले कागदपत्रांचा विचार केल्यावर व दोन्ही पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आरोपीने वरील कलमान्वये अपराध केल्याचे गृहीत धरण्यास आधार असल्याने ***कलम २४० फौ.प्र.सं.*** प्रमाणे आरोपी विरुध्द दोषारोपाची लेखी मांडणी ***नि.क्र.११*** नुसार करण्यात आली. आरोपीला दोषारोप वाचुन दाखविण्यात आले, ते समजावुन सांगण्यात आले आणि दोषारोप केलेला अपराध तो कबुल करणार आहे की, आपली संपरिक्षा केली जाण्याची मागणी करणार आहे, हे त्याला विचारण्यात आले. आरोपीने संपरिक्षा करण्याची मागणी केली. त्याप्रमाणे खटला सुरु करण्यात आला.

## साक्षीपुरावा

५. ***कलम २४२ फौ. प्र. सं.*** प्रमाणे अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आले. अभियोग पक्षाच्या साक्षीदाराची साक्षीतपासणी केल्यानंतर व आरोपींना त्यांचा बचाव देण्यास सांगण्यापूर्वी ***कलम ३१३ (१)(ब) फौ. प्र. सं.*** प्रमाणे आरोपीस त्यांच्या विरुध्द दिसणाऱ्या परिस्थीती विशेषांचा खुलासा करणे शक्य व्हावे यासाठी आरोपीची तपासणी करणे आवश्यक होते, परंतु आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. त्यामुळे आरोपीची वरील तपासणी करणेत आली नाही. आरोपींनी सुध्दा ***कलम २४३ फौ. प्र. सं.*** प्रमाणे बचावात साक्षीपुरावा दिला नाही. आरोपींचा बचाव असा आहे की, त्याला प्रस्तुत

प्रकरणात खोटे गोवण्यात आले आहे.

## मुद्दे व निष्कर्ष

**६.** तथ्यविषयक बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे माझ्या विचाराधीन येत आहे. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे. निष्कर्षावर पोहचण्यासाठीच्या कारणांचे उहापोह कारणमिमांसा शीर्षकाखाली करण्यात येत आहे;-

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दिनाक १५.०९.२०२२ रोजी आरोपीने फिर्यादीचे बहिणीची मुलगी **पिडीत-स** ला फिर्यादीच्या कायदेशीर ताब्यातून बैकादेशीर पणे पळवून नेवून तीचे अपहरण केल्याचे अभियोग पक्ष शाबित करतो काय ? | ...नाही. |
| २. कोणता आदेश ? | आरोपीची निर्दाष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा
## मुद्दा क्रमांक १ करिता

**७.** अभियोग पक्ष्या तर्फे मुद्दा क्र. १ शाबित करण्यासाठी साक्षीदार नामे **सौ. आरती सुरेश गेडाम साक्षीदार क्र.१ (नि.क्र-१८)** प्रमाणे तपासले आहे. आरोपीने **घटनास्थळ पंचनामा** लेखी स्वरुपात कबूल केले आहे. त्यामुळे **भारतीय पुरावा कायदा कलम ५८** प्रमाणे लेखी स्वरुपात मान्य केलेली बाब किंवा दस्त सिध्द करणेसाठी साक्षीदार तपासणेची गरज नाही. त्यामुळे सदर दस्त सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाला साक्षीदार तपासणेची आवश्यकता नव्हती. पंच साक्षीदार याची साक्ष न घेता सदर पंचनामा सिध्द झाला आहेत. त्यावरुन हे सिध्द झाले

की, घटनास्थळ अभियोग पक्षाने कथन केले प्रमाणेच आहे.

८. फिर्यादीने त्याच्या कथनाप्रमाणे त्याने पिडीत-स हरविल्याची फिर्याद दिली होती, फिर्यादीने पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याचे मान्य केले. परंतु सदर फिर्याद मध्ये काय नमुद आहे हे त्याला माहित नसल्याचे कथन केले आहे. साक्षीदार अभियोगपक्षाच्या कथनास साथ देत नसल्याचे पाहुन सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन त्याला ***भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४*** अन्वये उलटतपासणीमध्ये विचारण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु फिर्यादीने अभियोग पक्षाचे कथन फेटाळुन लावले व त्याने तसे पोलिसांना कधीही सांगितले नाही, असे कथन केले. साक्षीदार अभियोगपक्षाच्या कथनास साथ देत नसल्याचे पाहुन सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन तीला ***भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४*** अन्वये उलटतपासणीमध्ये विचारण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु फिर्यादीने अभियोग पक्षाचे कथन फेटाळुन लावले व तीला आरोपीने पळवू नेले नसल्याचे कथन केले. त्यामुळे आरोपीविरुध्द गुन्हयात गोवण्या इतपत तोंडी प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर आणता आला नाही.

**९.** आरोपी, फिर्यादी व पिडीत-स यांनी मिळुन न्यायालया बाहेर **नि.क्र.१७** प्रमाणे तडजोड केली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे ***फौ.प्र.सं. कलम ३२० (१) व (२)*** मध्ये आपसात मिटविण्यासारखे नसल्यामुळे फिर्यादी व आरोपी दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. फिर्यादी व पिडीत-स ने हे मान्य केले आहे की, त्यांनी आरोपीसोबत प्रकरण आपसात मिटवलेले आहे, त्यांना प्रस्तुत प्रकरण पुढे चालवायचे नाही किंवा कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाही. फिर्यादी व पिडीत-स यांनी अभियोग पक्षाच्या कथनास साथ दिलेली नाही. याच कारणामुळे सरकारी अभियोक्ता किंवा अभियोग पक्षाने पुढे कोणतेही साक्षीदार तपासले नाही. ***फौ.प्र.सं. कलम ३११*** प्रमाणे या न्यायालयालासुध्दा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी

कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा आवश्यक असल्याचे वाटले नाही. त्यामुळे न्यायालयाद्वारे सुध्दा कोणताही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

**१०.** वरील कारणमिमांसेवरुन व केलेल्या उहापोहावरुन असे स्पष्ट दिसते की, आरोपी विरुध्द वरील गुन्हे सिध्द करण्यासाठी कोणताही संयुक्तिक, सबळ व विश्वसनीय पुरावा पटलावर आणता आला नाही. अभियोग पक्षाने वरील कोणत्याही गुन्ह्याचे घटक सिध्द केले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष हे सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरला आहे की, आरोपीने वरील गुन्हे केलेले आहेत. त्यामुळे मी वरील मुद्द्यांचे उत्तर नकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्रमांक २ करिता

**११.** वरील मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपीस त्याचे विरुध्द लावण्यात आलेल्या सर्व आरोपातुन निर्दोष मुक्त करणे योग्य होईल. आरोपी, फिर्यादी व पिडीत-स यांचेत तडजोड झालेमुळे ***फौ.प्र.सं. कलम ३५७-अ*** प्रमाणे प्रस्तुत प्रकरणाची मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ यांचेकडे पिडीत व्यक्तीला नुकसान भरपाई मिळणेसाठी शिफारस न करणे योग्य होईल. आरोपीस ***फौ.प्र.सं. कलम ४३७-अ*** प्रमाणे निकटतम अपिल न्यायालया समोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरिता प्रतिभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. अंततः मी मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरात आरोपीची निर्दाष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील अंतिम आदेश पारीत करित आहे;

## आदेश

०१ आरोपी **प्रफुल देवानंद खंडारे,** रा. सायखेडा ता. केळापूर जि. यवतमाळ यांची ***भारतीय दंड विधान कलम ३६३*** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केल्याचे सिध्द न झाल्याने ***फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१)*** अन्वये त्याची निर्दोष मुक्तता करण्यात येते व त्यास मुक्त करण्यात येत आहे.

०२ आरोपीने ***फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७*** अन्वये दिलेले

जामीनबंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

०३ ***फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७-अ*** प्रमाणे प्रस्तुत प्रकरणाची मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ यांचेकडे पिडीत व्यक्तीला नुकसान भरपाई मिळणेसाठी शिफारस करणेत येत नाही.

०४ आरोपीने ***फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ*** प्रमाणे निकटतम अपिल न्यायालया समोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरिता प्रतिभुतीसह जमानत पत्र दयावे.

०५ प्रकरणातील जप्त मुददेमाल अपिल कालावधी नंतर मुळ मालकास मालकीचे कागदपत्राची पडताळणी करुन परत करण्यात यावे.

०६ न्यायनिर्णय ***फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५३ (१) (क)*** अन्वये जाहीर करण्यात आले.

sd/-

केळापूर (कु. सायमा निखत अब्दुल सत्तार शेख )
दिनांक - २१/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.०२, केळापुर.